माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ८८५/२०२२**

**अपिलार्थी, श्री. राजु अर्जुन फुलके**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१०,**
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक (मा.सं.व्य.),**
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०६.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०९.२०२१ | २७.१०.२०२१ | ११.१०.२०२१ | १७.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०२.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "कुवारा भिवसेन, चारगाव राउंड ता. पारशिवनी जि. नागपूर येथील क्षेत्र सहाय्यक या पदावर कार्यरत असलेले गुंड प्रवृत्तीचे श्री. श्रीकृष्ण अजबराव आसोले यांना त्वरीत सेवेतून बडतर्फ करणेबाबत दिलेला तक्रार अर्ज दि. २५.०१.२०२१ चे संदर्भाने माहिती अर्ज. माहितीचे वर्णन वरीलप्रमाणे असून दि. २५.०१.२०२१ रोजीच्या तक्रारी संबंधाने आपल्या कार्यालयाकडून तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विहीत कालावधीत देण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.१०.२०२१ रोजी अपिलार्थीस १ पानाची माहिती पुरविण्यात आलेली आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ११.१०.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती ठराविक मुदतीत न मिळाल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.११.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक १७.११.२०२१ अन्वये, १) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१० यांनी त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष -१०(२)/आस्था/तीन/प्र.क्र.१११/(२१-२२)/११७०, दिनांक २७.१०.२०२१ अन्वये अपिलकार यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची प्रत विनामुल्य पुरविण्यात आली आहे. २) अपिलार्थी यांनी त्यांचे

दिनांक २०.०१.२०२१ रोजीचे अर्जान्वये केलेली तक्रार बद्दल केलेल्यां कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त नागपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/तीन/प्र.क्र.६८(२०-२१)/१२४५, दिनांक १२.०२.२०२१ अन्वये सुचित केलेले आहे. मात्र त्यांचेकडून अद्यापपर्यंत अहवाल येणे बाकी असल्याने, सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा चौकशी अहवाल मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर वनवृत्त, नागपूर यांचेकडून प्राप्त करणेबाबत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१० यांना सुचित केले, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २५.०३.२०२२ रोजी** " आजपर्यंत माहिती दिलेली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २५.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १०.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी हे व्यक्तीश: उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१०, श्री. एन.एस. झाडे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक (मा.सं.व्य.) श्री. गिन्नी सिंह हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. राजु फुलके यांनी दिनांक ०२.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र-अ नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी श्री. फुलके यांचा तक्रार अर्ज प्राप्त होताच दिनांक १२.०२.२०२१ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांना सदर प्रकरणी योग्य ती चौकशी करुन कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करावा, या सुचनेसह अग्रेषित केलेला आढळून येतो. तसा प्रतिसाद अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन दिनांक २७.१०.२०२१ रोजी देण्यात आलेला आहे. मात्र वरील प्रतिसादाने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.१०.२०२१ रोजी सुनावणी सुचना जारी करुन दिनांक १६.११.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक (मानव, संसाधन व व्यवस्थापन), नागपूर यांनी सविस्तर व स्वंयस्पष्ट आदेश पारीत केले असून अपिलार्थी यांनी दिनांक २०.०१.२०२१ रोजीचे अर्जान्वये केलेली तक्रार ही "कुवारा भिवसेन, चारगाव राऊंड, ता. पारशिवनी, जि. नागपूर येथील क्षेत्र सहायक या पदावर कार्यरत असलेले श्री. श्रीकृष्ण अजाबराव आसोले यांना सेवेतून बडतर्फ करण्यासंदर्भात असून याबाबत दिनांक १२.०२.२०२१ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांना सदर प्रकरणी योग्य ती चौकशी करुन कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करण्याबात सुचीत केले आहे. त्यानुसार सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा चौकशी अहवाल मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचेकडून प्राप्त करण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१० यांना सुचीत करण्यात आले आहे व अपील अर्ज निकाली काढलेला आहे. मात्र अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. नितीन झाडे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक (मानव, संसाधन व व्यवस्थापन), नागपूर श्री. गिन्नी सिंह हे ऑनलाईन पध्दतीने



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

उपस्थित असून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयाच्या वतीने दिनांक १२.०२.२०२१ रोजी निर्गमित केलेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा दस्ताऐवज स्वरुपातील तपशिल प्राप्त करुन घेवून अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत लवकरात लवकर प्रदान करण्यात येईल, असे आश्वासित केले आहे. वरील आश्वासनाच्या अधिन राहून व दिनांक १२.०२.२०२१ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयाच्या वतीने मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांना निर्गमित करण्यात आलेल्या श्री. राजु फुलके व इतर यांच्या दिनांक २०.०१.२०२१ रोजीच्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल प्राप्त करुन घेवून अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १०.०६.२०२४**

जावक क्रमांक ----८५२७---- दिनांक 30 AUG 2024